सत्यमेव जयते

राज्य निवडणूक आयोग
महाराष्ट्र

# राज्य निवडणूक आयोग

## महाराष्ट्र

१ ला माळा, नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई- ४०० ०३२.

---

(प्रसिद्धिपत्रक) दि. २६ सप्टेंबर २०१८

### ९३० ग्रामपंचायतींसाठी अंदाजे ७९ टक्के मतदान

मुंबई, दि. २६ (रा.नि.आ.): राज्यातील विविध २६ जिल्ह्यांमधील ९३० ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी आज सरासरी ७९ टक्के मतदान झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे, अशी माहिती राज्य निवडणूक आयुक्त ज. स. सहारिया यांनी आज येथे दिली.

श्री. सहारिया यांनी सांगितले की, ऑक्टोबर २०१८ ते फेब्रुवारी २०१९ या कालावधीत मुदत संपणाऱ्या व नवनिर्मित ग्रामपंचायतींसाठी हे मतदान झाले. यात ९३० ग्रामपंचायतींच्या सदस्यपदांबरोबरच सरपंचपदाच्या थेट निवडणुकांचाही समावेश आहे. मतदानाची वेळ सकाळी ७.३० पासून सायंकाळी ५.३० पर्यंत होती. गडचिरोली जिल्ह्यातील ग्रामपंचायतींसाठी मात्र सकाळी ७.३० पासून दुपारी केवळ ३.०० पर्यंतच मतदानाची वेळ होती. मतमोजणी उद्या (ता. २७) होईल.

**मतदान झालेल्या ग्रामपंचायतींची जिल्हानिहाय संख्या: ठाणे-** ५, **रायगड-** ९६, **रत्नागिरी-** १५, **सिंधुदुर्ग-** ३, **नाशिक-** २०, **धुळे-** ७४, **जळगाव-** ५, **अहमदगनर-** ६६, **नंदुरबार-** ५४, **पुणे-** ४७, **सोलापूर-** ५९, **सातारा-** ३२, **सांगली-** १, **कोल्हापूर-** १५, **बीड-** २, **नांदेड-** १२, **उस्मानाबाद-** ४, **लातूर-** ३, **अकोला-** ३, **यवतमाळ-** ३, **बुलडाणा-** २, **नागपूर-** ३७३, **वर्धा-** १५, **चंद्रपूर-** १५, **भंडारा-** २ आणि **गडचिरोली-** ४. **एकूण-** ९३०.

0-0-0

(Jagdish More, PRO, SEC)